**वादीतर्फे साक्षीदार क्र ०१ ची उलटतपासणी.**
देवाची शपथ खरे सांगतो

**नाव:-**सुर्यकांत हरिभाउ ढगे.

<u>**उर्वरित उलटतपास प्रतिवादी यांच्यातर्फे श्री जी.आर.हुंगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू**</u>

**प्रश्न-** शपथपत्रामधील परिच्छेद क्र. १८ प्रमाणे तुम्हाला शेती काय म्हणुन दिली होती.
**उत्तर-** मी घरातील मोठा होतो, मला शेतीचा अनुभव होता म्हणुन मला शेती दिली होती. सदर शेती मला दिल्याबाबत लिखापडी झाली होती. शेती मला दिल्याचा लेख लिहीला होता. सदर लेख माझे आई-वडील व माझे वहीण-भाऊ यांच्यासमोर लिहून दिला होता सर्वांच्या स्वक्षरीसहीत दिला होता. सदर लेख १९७६ मध्ये लिहून दिला होता. सदर लेख मला एका कागदावर लिहून दिला होता स्टँप पेपरवर लिहून दिला नव्हता. सदर लेखामध्ये मी घरातील मोठा भाऊ असल्याने मी प्रकाश याचे शिक्षण पुर्ण करावे असे लिहीलेले होते. सदर लेख नोंदनिकृत केला नव्हता. सदर लेख मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, प्रकाशकडे आहे. सदर लेख प्रकाश यांच्याकडे असल्याबाबत मी सदर लेख दाखल करण्याकामी त्यांना नोटीस दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर लेख तयारच केलेला नाही तसेच तो लेख प्रकाश यांचेकडे नाही त्यामुळे सदर लेख दाखल करण्याकामी मी नोटीस त्यांना दिलेले नाही. मी वाद शेतीचा मालक प्रतिवादी प्रकाश यांच्याकडे असलेलया लेखाप्रमाणे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वाद शेतीवर प्रतिवादी प्रकाश यांनी कर्ज घेतले होते. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१८ पान नं.०७ मधील मजकूर बँकेचे कर्ज प्रतिवादी क्र. ०१ याने घेतले होते व ते कर्ज बँकेला परतफेड केले नाही हा अधोरेखांकित भाग अ मला वाचुन दाखविण्यात आला तो चुकीचा लिहीलेला आहे. **यावर प्रतिवादी यांचे वकील श्री.एस.डब्लू.तिजारे यांनी हरकत घेउन सांगितले की, मृत्यूपत्रातील मजकूर हा आव्हानित केलेला आहे व त्याबाबतचा मजकूर हा पुराव्याच्या शपथपत्रामध्ये घेतलेला आहे त्यामुळे**

**वरिल बाब शपथपत्रामध्ये आलेली आहे व सदर मृत्युपत्र हे आव्हानितच केलेले नाही असे गृहीत धरून वरिल प्रश्न विचारला गेलेला आहे. यावर वादी यांच्या वकीलांनी सांगितले की, शपथपत्रातील मजकुराबाबतच मी प्रश्न विचारलेला आहे व पुर्णविरामानंतर ते पुर्णविरामापर्यंत सदर अधोरेखांकित भाग अ बाबत प्रश्न विचारलेला आहे.** सदर हरकत व त्यावरील युक्तीवाद हा अंतिम युक्तीवादासाठी खुला ठेवण्यात येत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/१०/२००८ ला हरिभाउ यांनी जे मृत्युपत्र करून दिले होते त्यावेळेस हरिभाउ यांची प्रकृती चांगली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६/१०/२००८ ला हरिभाउ हे स्वत: नोंदणी कार्यालयात आले होते. दि.०६/१०/२००८ ला हरिभाउ यांना अशक्तपणा आला होता व ताप होता. मीच हरिभाउ यांना गोळ्या आणुन दिल्या होत्या. सदरहु गोळ्या डॉक्टरांनी दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. ४३ वरिल स्टँप हा हरिभाउ ढगे यांच्या नावाने आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मला वकीलसाहेबांनी प्रश्न पूर्णपणे विचारला नाही आणि पुढे सांगतात की, सदर स्टँप वडीलांच्या नावाने आहे परंतु वडीलांनी विकत घेतलेला नाही. सदर स्टँप हरिभाउ ढगे यांनी विकत घेतलेला नाही करण त्याच्यावर प्रकाश ढगे किंवा त्याच्या मुलाची सही असु शकते. सदर साक्षीदार सांगतो की, मी सदर स्टँप अभिलेखावर दाखल करू शकतो व पुन्हा सांगतो की, सदर स्टँप अभिलेखावर दाखल केला आहे व तोच मला आता दाखविण्यात आला होता. सदर साक्षीदारांना प्रतिवादीच्या वकीलांनी सदर स्टॅपपेपर दाखविला असता सदर साक्षीदार सांगतो की, माझा चष्मा घरी राहीला आहे माझा चष्मा आणल्यावर मी वाचतो. सदर साक्षीदार सांगतो की मी आज सदर स्टँप चष्म्याशिवाय वाचु शकत नाही त्यामुळे उलटतपास तहकूब करावा. सदर साक्षीदाराने पुढील तारखेपर्यंत उलटतपास तहकूब करण्याची विनंती केली सबब उलटतपास तहकूब.

**उलटतपास तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०७.०१.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड